# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - III

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

उ.१ अ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

(i)




(ii) 1




(२) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

लेखक सभासदांची दांडी उडवण्याचा प्रयत्न करत असे.

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

कोणी नाही असे पाहून ते मला **चेंडू** फेकायला बोलवत.

(३) **व्याकरण :**

(i) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

एक - विशेषण

(ii) **वचन बदला.** 1

(i) चेंडू – चेंडू (ii) डोळा – डोळे

(४) **स्वमत :** 2

लेखक शिक्षणासाठी जेव्हा काकांकडे राहण्यास गेले. त्यावेळी त्यांच्या जीवनाला एक वेगळी कलाटणी मिळाली. काका वाय. एम. सी. ए. कंपाऊंड मध्ये राहत होते. तेथे वाय.एम.सी. ए चे सभासद इतर खेळा-बरोबर क्रिकेट खेळण्यासाठी येत असत. लेखक खेळ पाहण्यासाठी जात असत. त्याचवेळी त्यांची क्रिकेट खेळण्याची इच्छा वाढीस लागली. शाळा सुटली रे सुटली की ते ग्राऊंडवर हजर होत असत. त्यावेळी ते सभासद लेखकास खेळण्यासाठी बोलवत. त्यांना चेंडू फेकण्यास सांगत आणि लेखकही त्या कामासाठी सदैव तयार होत असत. लेखक ग्राऊंडवर केवळ खेळ पाहायला मिळावे म्हणून जात असत पण इथे तर त्यांना प्रत्यक्ष खेळायलाही मिळू लागले.

अशाप्रकारे क्रिकेटची आवड आणि प्रत्यक्ष खेळाडूंसोबत खेळण्याचा आनंद व्यक्त करताना लेखक 'आंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन' असे मत व्यक्त करतात.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

(i)




(ii) 1




(२) **सकारण लिहा.** 1

(i) कवितांची व आपली फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे कारण शालेय जीवनात पाठ्यपुस्तकातील सगळ्या कविता तालासुरांत म्हटल्या जातात.

(ii) मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरून आला कारण, साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' या कादंबरीला मिळाला. 1

(३) **व्याकरण :**

**पर्यायी शब्द लिहा.** 2



(४) **स्वमत :** 2

मला आवडलेला साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी. कादंबरी म्हणजे मोठी कथाच. विविध पात्रांनी, प्रसंगांनी नटलेली, सजलेली. कादंबरी जर खुमासदार असेल तर, ती हातातून सोडवत नाही. पुढे काय होणार याची उत्कंठा लागते. त्यातील पात्रांचा परिचय होतो व ती पात्रे आपल्याला आपल्यातीलच वाटू लागतात. कादंबरीत मन रममाण होते. सुखाच्या प्रसंगात भान हरपते. दु:खी प्रसंगाने अतिशय वाईटही वाटते, इतके तादात्म्य कादंबरीशी साधता येते. 'ययाती', 'स्वामी', या कादंबऱ्या माझ्या आवडत्या आहेत.

## अपठित गद्य

उ.१ **इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **कृती पूर्ण करा.**

(i) 1

**यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे मनुष्यत्वाचे ध्येय.**
- स्वातंत्र्य
- समता

(ii) 1

**सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य**
- धार्मिक
- राजकीय

(२) **उत्तरे लिहा.**

(i) ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेणे. 1

(ii) शेतकी, कला-कौशल्य, मजुरी. 1

(३) **व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** 2

| शब्द | प्रत्यय | सामान्यरूप |
|---|---|---|
| **परमेश्वराने** | ने | परमेश्वरा |
| **मानवांना** | ना | मानवां |

(४) **स्वमत :** 2

संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, राष्ट्रप्रेम इत्यादी हक्क दिले आहेत. मनुष्याने त्या हक्कांचा वापर स्वत:चा स्वार्थ पूर्ण करून घेण्यासाठी करू नये. आपल्या हक्कांचा

| | | |
|---|---|---|
| | वापर करून कोणाचे नुकसान करू नये. भारतदेशाची अखंडता टिकावी, धार्मिक सलोखा अखंड राहावा, सर्वांनी समाधानाने आणि एकत्वाने येथे नांदावे अशा करीता आपल्या हक्काचा वापर मनुष्याने करावा.<br>मनुष्याला सुख प्राप्त व्हावे. कोणावरही अन्याय होऊ नये, प्रत्येकाच्या गरजा भागाव्यात, प्रत्येकाला समान वागणूक मिळावी यासाठीच तर भारतीय राज्य घटनेने आपल्याला समान हक्क दिले आहेत. त्या हक्कांची पायमल्ली होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी. एक सुजाण, जबाबदार नागरिक बनावे. | |
| | **विभाग २ – पद्य** | |
| उ.२<br>(१) | **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**<br>**कसं ते पूर्ण करा.** | |
| | **हसावं** - सळसळत्या पानासारखं | ½ |
| | **मुरावं** - झाडांसारखं घट्ट पाय रोवीत | ½ |
| | **जगावं** - हिरवंगार झाडासारखं | ½ |
| | **चिंतन** - झाडासारखं | ½ |
| (२) | **(i) खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.**<br>झाडाच्या मुळावर घाव घातला तर झाड मुकाट सहन करते. | 1 |
| | **(ii)** झाड पुन्हा नवीन वस्त्र केव्हा धारण करतं ? | 1 |
| (३) | **पुढील ओळीचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.**<br>पक्षी झाडांवर सतत येत असतात. घरटे बांधून राहतात. काम झाले की, फळे चाखून, खाऊन पुन्हा दुसरीकडे उडून जातात. झाड त्यांना निवारा देते, अन्न देते. ऊन-पावसापासून रक्षण करते, पण जेव्हा झाडावर घाव घातले जातात, ते कापले जाते तेव्हां पक्षी स्वत:चाच विचार करून झाडावरून उडून जातात. परंतु, झाड मात्र हिरवेगार असताना येणाऱ्या पक्ष्यांना कधीही अडवत नाही, आश्रय नाकारत नाही. म्हणूनच पक्षी झाडांचे कुणीही नसून झाड त्यांचे असते असे कवी म्हणतात. | 2 |
| (४) | झाडांचे मानवी जीवनातील स्थान अतुलनीय आहे. संपूर्ण पर्यावरण झाडांवर अवलंबून आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यात झाडे अग्रेसर आहेत. झाडांमुळे फळे, फुले, औषधे तर मिळतातच, पण थकलेल्या जीवाला सावली मिळते. झाडांमुळे पाऊस पडतो. झाडे मानवी जीवनातील 'श्वास' च आहेत. त्यावाचून आपले जीवन जगणे अशक्य आहे. | 2 |

उ.२ **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी आवश्यक गोष्टी

- एकोपा
- श्रमशक्ती
- उद्योग
- हस्त शुभंकर

(२) **खालील शब्दसमूहांतील संकल्पना स्पष्ट करा.**

(i) हस्त शुभंकर – राबणारे हात, कल्याणकारक हात 1

(ii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार – सर्व जगात उत्क्रांतीचा, प्रगतीचा जयघोष करणे 1

(३) **खालील काव्यपंक्तीमधून सूचित होणारा अर्थ लिहा.** 2

शेतकरी जणू आपल्या कष्टाने चैतन्याचे, आनंदाचे सुदर्शनचक्र फिरवत असतो. त्याच्या मेहनतीमुळेच शेताशेतांतून धान्यरूपी मोत्याचे 'सुदर्शन' आपल्याला घडते. त्याच्याबरोबर मेहनत करून आपणही या शेतातून, मातीमधून मोती म्हणजेच धान्यरूपी अपार धन पिकवूया. आपल्या धरतीला सुलजाम् सुफलाम् बनवूया.

(४) 'स्वप्न करू साकार' या कवितेतून श्री. किशोर पाठक यांनी 'एकजूटीचे सामर्थ्य' हे मूल्य मनात रूजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. कोणतेही काम एकट्याने करून पूर्ण होत नाही. घरी तयार होणाऱ्या अन्नपदार्थांसाठी अगदी शेतकरी दादापासून, दुकानदार, कामगार, वाहतूक या सर्व घटकांची मदत आवश्यक असते. तसेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीने काम करणे तितकेच महत्त्वाचे आहे. 2

'हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट' या पंक्तीवरून सिद्ध होते की, देशाची जनता एकत्र आली तर मनगटात बळकटी येईल व प्रगती शक्य होईल. सर्वांची शक्ति पणाला लावून कृषि व उद्योग यामध्ये उत्क्रांती होईल. या मातीवर जसा सर्वांचा अधिकार आहे, तसाच सर्वांनी मिळून मिसळूनच नव्या युगाचे स्वप्न साकारायचे आहे. भारताची संस्कृती व परंपरा थोर आहे, पण ती जपून वाढवायची आहे. हे एकजूटीने साध्य होणार आहे. साऱ्या विश्वात एकजुटीने भारताचा जयजयकार करायचा आहे.

उ.२ **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** 4

(१) ही काव्यपंक्ती 'औक्षण' या कवितेतील आहे. कवयित्री इंदिरा संत यांनी लढाईला जाण्यासाठी सज्ज असलेल्या जवानाचे औक्षण देशवासीयांकडून कसे होत आहे हे या कवितेत दर्शविले आहे.

जवान आपल्या जीवावर उदार होऊन लढत असतो. पराक्रमाची शर्थ करतो. तो लढाईला जाताना त्याला ओवाळण्याची म्हणजे औक्षण करण्याची प्रथा आहे. जो सैनिक देशासाठी आपले बलिदान देतो त्यासाठी आपला जीवही ओवाळला तरी कमीच आहे अशी कवयित्रीची उच्च भावना आहे. सर्वात मोलाचा माणसाचा जीव असतो. पण त्याहीपेक्षा मोलाची सैनिकाची शौर्यगाथा आहे असे कवयित्री आदराने म्हणते. त्यापुढे जीवाची शान ती किती ? अर्थात जीवही फार लहान वाटतो.

जीव व शौर्यगाथा यांचे तुलनात्मक स्पष्टीकरण करून शौर्याची महानता कवयित्रीने उलगडली आहे. लहान व शान शब्दांमुळे यमक साधले गेले आहे. भावनांचा कल्लोळ यातून प्रकट होतो. ही एक विशुद्ध भावकविता आहे.

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** 3

(१) आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांमध्येही वापरला जातो. कसा ते लिहा.

उदा. दिवाळी

| **संस्कृत** | **बंगाली** | **हिंदी** | **पंजाबी** | **गुजराती** | **सिंधी** |
|---|---|---|---|---|---|
| दीपालि | दिउयाली | दिवाली | दिवाली | दिवाळी | डिआरी |

(२) वाळवंटी प्रदेशात कॅक्टसचे रोप लहान असते तेव्हा त्याला दोन चार लहान पाने येतात. नंतर ते झाड बिनपानांचे राहते. याचे मुख्य कारण म्हणजे झाडाचे बरेचसे पाणी त्यांची पाने बाष्पीभवनाने गमावतात त्यामुळे कॅक्टसच्या झाडाने पान ही गोष्टच काढून टाकली आहे. कॅक्टसच्या झाडामध्ये रसदार गर असतो, म्हणून त्यावर प्राण्यांच्या धाडी पडण्याचा धोका असतो. त्यासाठी खबरदारी म्हणून कॅक्टस झाडाच्या अंगावर धारदार बोचरे काटे पसरलेले असतात. तसेच वाळवंटातून प्रवास करणारे लोक तहान भागवण्यासाठी कॅक्टसचे घट्ट साल सोलून त्यातील गरातील पाणी पितात. पण त्याचे काटे फार धारदार असतात. ते सारे तोडून काढून फक्त वाटीभर पाणी मिळवणे खूप त्रासाचे असते. अगदी निरुपाय झाला तरच प्रवासी ही मेहनत घेतो. जनावरांनी ओरबाडून खाऊ नये म्हणून ह्या झाडांनी काट्यांची शस्त्रे केली आहेत. 3

(३) **टिपा लिहा.** 3

सग्वारो कॅक्टस वाळवंटी प्रदेशाचा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जातींमध्ये सग्वारो हा कॅक्टसचा राजा मानला जातो. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. त्याची वाढ मंद असते इतकी, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्षे जगतो. सग्वारो कॅक्टसची फुले गेंदेदार असतात ही फुले फुलली की थोडा काळ तरी ओसाड वाळवंट सौंदर्यपूर्ण होते. सग्वारो कॅक्टसला फळे येतात. त्यातील गर कलिंगडासारखा असतो. सग्वारो कॅक्टस हात वर करून उभ्या राहिलेल्या एखाद्या मोठ्या बाहुल्यासारखा दिसतो.

सग्वारो कॅक्टसचा उपयोग अमेरिकेतील रेड इंडियन करीत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. सग्वारो कॅक्टसची फळे ही कलिंगडाच्या गरासारखी असल्याने खाण्यासाठी उपयोग होतो. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो. रेड इंडियन लोकांचे हे ही एक खाद्य असते.

विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **चौघडी** | चार घड्यांचा समूह | द्विगू समास |
| (ii) | **नफातोटा** | नफा किंवा तोटा | वैकल्पिक द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

खालील ओळीतील उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान धर्म (गुण) असे वर्गीकरण करा.

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| त्याचे अक्षर | मोती | सारखे | सुंदर |

(iii) **वाक्यरूपांतर** 2

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. पत्र आल्यापासून तो त्याच दु:खात नव्हता.

२. किती भुरळ पाडली मला या खेळानेच!

(iv) **सामान्यरूप** 2

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| क्र. | दिलेला शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (१) | **प्रत्येकाने** | प्रत्येक | प्रत्येका |
| (२) | **नियमानुसार** | नियम | नियमा |

(v) **वाक्प्रचार**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. माधुरीच्या नृत्याच्या अदांनी मला **भुरळ पाडली.** 1

२. मी पोलीस अधिकारी होण्याची मनाशी **खूणगाठ बांधली.** 1

उ.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. तारीफ - वाहवा, प्रशंसा, स्तुती     २. वृत्ती - स्वभाव

| | | |
|---|---|---|
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>१. विचार × [अविचार]     २. आस्था × [अनास्था] | 1 |
| (iii) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**<br>दुष्काळामुळे बाधीत झालेले लोक - [दुष्काळग्रस्त] | 1 |
| (iv) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>[पाय] ⟵ चरण ⟶ [कवितेची ओळ] | 1 |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन** | |
| (i) | **अचूक शब्द ओळखून लिहा.**<br>१. व्यक्तिमत्त्व<br>२. सामूहिक | 1 |
| (ii) | **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>**आतापर्यंत** किती झाडं **तुम्ही** लावली आहेत? | 1 |
| (३) | **विरामचिन्हे**<br>**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| | १. 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा,' रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या. | 1 |
| | २. 'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. | 1 |
| (४) | **पारिभाषिक शब्द**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>१. Workshop - कार्यशाळा     २. Index - अनुक्रमणिका, निर्देशांक | 1 |
| (५) | **भाषिक खेळ**<br>**दोन नादानुकारी शब्द लिहा.**<br>जसे-घणघणली –<br>खणखणली, दणदणली | 1 |

## विभाग ५ – उपयोजित लेखन

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5

दिनांक : ३० एप्रिल, २०१८

प्रति,

मा. संचालक,

श्री. विनय गायकवाड,

२, सोमवार पेठ,

कराड.

**विषय :** सुलेखन वर्गात प्रवेश मिळण्याबाबत

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार

मी अ.ब.क., शिवछत्रपती विद्यालय, कराड या शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी आहे. पुढील शैक्षणिक वर्षात मी इयत्ता १० वी मध्ये जाणार आहे. माझे मराठी विषयाचे अक्षर म्हणावे तसे वळणदार नाही. मला येत्या शैक्षणिक वर्षात चांगले गुण हवे आहेत. तेव्हा आपण आपल्या मराठी भाषेच्या लेखनासाठी काय उपाय करू शकतो, या विचारात असतानाच आज अचानक आमच्या शाळेत आपल्या ॲकॅडमीतर्फे येत्या उन्हाळ्याच्या मे महिन्यात १ मे ते ३१ मे या कालावधीत सुलेखन वर्गाचे आयोजन केल्याची जाहिरात पाहिली.

ही माझ्यासाठी एक सुवर्णसंधीच म्हणावी लागेल. आता निश्चितच माझे हस्ताक्षर चांगलेच सुधारेल अशी आशा वाटते. तेव्हा मी आपणांस विनंती करते की, आपण मला या वर्गात प्रवेश देऊन माझे अक्षर सुधारण्याची संधी द्यावी.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपली कृपाभिलाषी,

अ.ब.क.

शिवछत्रपती विद्यालय,

कराड.

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

झाडावरून उतरून माणूस चालू लागला. आपली दृष्टी, हात व बुद्धीचा वापर करून त्याने आपले भक्ष्य, भाषा, हत्यारे, अग्नी, चाक व लिपी यांचा शोध लावला. आपल्या बुद्धीने त्याने पृथ्वीवरील आपले अस्तित्व टिकवले जे इतर महाकाय प्राण्यांना जमले नाही. त्याच्या उत्क्रांतीचे हे पूर्ण रहस्य अजूनही उलगडलेले नाही.

उ.५ **आ. खालील कृती सोडवा.**

(१) **कथा लेखन** 6

**दोघांचे भांडण, तिसऱ्याचा लाभ**

सोनपूर गावात शाम नावाचा एक शेतकरी राहत होता. त्याची थोडीफार शेती होती व शेतीसाठी दोन बैलही त्याच्यापाशी होते. एक ढवळ्या व दुसरा पवळ्या. त्यांची चांगली मैत्री होती. जंगलात चरण्यासाठी-सुद्धा ते एकत्रच जात असत व एकत्रच परत येत असत.

दररोज हे बैल ढवळ्या व पवळ्या सकाळ संध्याकाळ नित्यनियमाने चरण्यासाठी शेजारच्या जंगलात जात असत. जंगल घनदाट असल्यामुळे हिंस्त्र प्राण्यांचाही तेवढाच धोका होता. त्यामुळे ते दोघेही एकत्रच चरण्यासाठी जात असत. एके दिवशी मात्र भीती होती तेच घडले. एका सिंहाने दररोज नजर ठेऊन एके दिवशी पूर्ण ताकदीनिशी त्यांच्यावर हल्ला चढविला. पण त्या दोन्ही बैलांनी एकजुटीने सिंहावरच हल्ला केला व तो दे माय करत पळून गेला. त्यांच्या एकीमुळेच यावेळेस ते बचावले.

सिंहाच्या मनात मात्र सुडाची भावना पेटली होती. त्यामुळे त्यांना कसे मारायचे याचा विचार तो करत होता. शेवटी त्याला एक युक्ती सुचली. त्याने त्यांची मैत्री तोडण्याचे ठरविले. दोघांचे एकमेकांविरूद्ध कान फुंकले व त्यांच्या मनात तिरस्कार निर्माण केला. हळूहळू दोघांमध्ये अबोला झाला व दोघेही वेगळे झाले.

एके दिवशी ढवळ्याला एकटे बघून सिंहाने त्याच्यावर झडप घातली व त्याला खाऊन टाकले. नंतर पवळ्याच्या बाबतीतही त्याने तोच प्रकार केला. दोघांच्या झालेल्या भांडणात सिंहाचा मात्र फायदा झाला पण त्या बैलांना मात्र आपला जीव गमवावा लागला.

(२) **जाहिरात लेखन**

**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती लिहा.**

१) चौकट पूर्ण करा.

(i) दुकानाचे नाव - प्रणव स्टेशनरी मार्ट 1

(ii) जाहिरातीतील टीप - आमची कोठेही शाखा नाही. 1

२) दुकानाची वैशिष्ट्ये:

(i) शालोपयोगी साहित्याचे विश्वसनीय नाव ½

(ii) वह्या-पुस्तकाचे होलसेल व्यापारी ½

(iii) मराठी व इंग्रजी माध्यमातील शालेय पाठ्यपुस्तके उपलब्ध ½

(iv) योग्य किंमत ½

३) जाहिरातीतील चित्रे – पेन – पुस्तके 1

४) स्टेशनरीचा पत्ता – शॉप नं. ३, गंगा प्लाझा, एम. जी. रोड, मुलुंड (प.), मुंबई – ४०००८०. 1

| उ.५ (१) | इ. लेखनकौशल्य | |
|---|---|---|

**इ. लेखनकौशल्य**

उ.५ (१)

**मी अनुभवलेला व पाहिलेला 'अब्दुलचा सत्कार समारंभ'** 8

'अब्दुलला ओळखणाऱ्या प्रत्येकाला त्याच्याबद्दल एक आदराची व आपुलकीची भावना वाटते. खरं तर, या विभागात तो 'चुडीवाला' म्हणूनच अधिक प्रसिद्ध आहे. समाजातील अनेक प्रकारच्या भेदभावामुळे आपण आपले वैरी झालो आहोत. कुटुंबाच्या मर्यादित आपल्या सुखदु:खाचे विश्व फारच मर्यादित झाले आहे. पण या मर्यादा ओलांडून समाजसेवेचे व्रत घेतलेली काही माणसे असतात. त्यापैकी एक होता अब्दुलमियाँ. त्या दिवशी ते आमच्या घरी आले ते सत्काराचे निमंत्रण देण्यास. मी नक्की उपस्थित राहाण्याचे आश्वासन त्यांना दिले.

मी व माझी ताई वेळेवर कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचलो होतो. ज्येष्ठ समाजसेवा मंडळातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मंडळातर्फे समाजातील दहा श्रेष्ठ समाजसेवकांचा सत्कार होणार होता. त्यातच एक अब्दुलमियाँही होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी नेहमीप्रमाणेच आवाज, गडबड, गोंधळ होता. व्यासपिठावर एक भलामोठा फलक लावण्यात आला होता. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती उपस्थित होते. स्वागत पद्य, ईशस्तवन, पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगून मुख्य कार्यक्रम सुरू झाला.

मला जाणून घ्यावयाचे होते की, अब्दुलमियाँने कोणती मोठी समाजसेवा केली म्हणून आज त्यांचा सत्कार व गौरव केला जाणार आहे. प्रत्येक सत्कारमूर्तीला मनोगतही व्यक्त करायचे होते. कार्यक्रम खरोखर चांगला होता. समाजसेवेच्या रुपाने समाजऋण व माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्याच्या कार्याचे कौतुक करून इतरांना समाजसेवेची प्रेरणा देणे हाच मुख्य उद्देश होता.

अब्दुलमियाँच्या नावाची घोषणा झाली. मी कान टवकारले. त्यांच्याविषयी काय सांगतात हे मला ऐकावयाचे होते.

परिचयकर्ता सांगू लागला - 'अब्दुलमियाँ' ज्यांना आपण 'चुडीवाला' या नावानेही ओळखतो. ते एका गरीब कुटुंबात जन्मले. सात भावंडात ते सर्वात लहान. शिक्षण झालेच नाही कारण गरिबी. बांगड्या विकणे हाच व्यवसाय. हातावरच पोटाचा भार. पण दादासाहेब पटवर्धन यांच्या सहवासाने त्यांनी समाजसेवा सुरु केली. कुष्ठरोगी महिलांना बांगड्या भरण्यास कोणताही बांगडीवाला तयार नव्हता. आम्हांला तुमचे पैसे व संपर्कही नको म्हणून बांगडीवाले कुष्ठरोगी महिलांना टाळत होते. पण अब्दुल मियाँनी मात्र स्वत:हून इथे येण्याचे व माय-भगिनींना मोफत बांगड्या भरण्याचे कार्य आजतागायत सुरू ठेवले आहे. या त्यांच्या कार्यामुळे कुष्ठरोगी महिलांच्या जीवनात आनंदाचा वर्षाव ते करतात. तसेच नगरपालिकेच्या 'बालक-माता आरोग्य योजने'च्या कार्यक्रमातही ते सहभागी होतात. ते सुद्धा कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता. त्यांचे हेच समाजकार्य व मानवसेवा अनमोल आहे. म्हणून ही संस्था त्यांचा सत्कार व गौरव करीत आहे. या कार्यात त्यांच्या कुटुंबियांचीही त्यांना मोलाची साथ मिळते. अब्दुलमियाँनी केवळ धन्यवाद एवढे शब्द उच्चारून अभिवादन केले.

असा हा अनोखा, आगळा वेगळा सत्कार सोहळा मी अनुभवला जो अत्यंत प्रेरणादायी आहे. या अब्दुलमियाँ विषयी मला एवढेच म्हणावेसे वाटते .....

दिव्यत्वाची जेथ प्रचिती।
तेथे कर माझे जुळती ।।

(२) **पिंजऱ्यातील पोपटाचे आत्मवृत्त** ४

''मित्रा, मी पिंजऱ्यातला पोपट बोलतो आहे. मी या पिंजऱ्यात दु:खी कष्टी जीवन जगत आहे. आता मला हे जीवन नकोसे झाले आहे. काय हे माझं दुर्भाग्य ! माझ्या स्वप्नातदेखील असा विचार आला नाही की, मला पिंजऱ्यात बंदिस्त व्हावे लागेल. या पिंजऱ्यात मला मधुर फळे खायला मिळतात. घरातील सर्वजण माझे कौतुक करतात. पण मला कोणीही पिंजऱ्यातून बाहेर काढत नाही. आजही मला माझे पूर्वीचे स्वातंत्र्याचे दिवस आठवतात आणि असे हरवून गेलेले आनंदाचे क्षण परत माझ्या जीवनात कधी येणार, या विचाराने माझे मन व्याकूळ होते.

बालपणी मी किती सुखात होतो ! अतिशय निसर्गरम्य असे ते जंगल होते. त्या जंगलातील एका झाडावरील ढोलीत माझा जन्म झाला. त्या ढोलीतून मी प्रथम बाहेर पाहिले तेव्हा आसपासचा नयनरम्य देखावा पाहून मला किती आनंद झाला होता! पुढे माझ्या पंखात बळ आल्यावर आईवडिलांनी मला निळ्या आकाशात उडायला शिकविले. जंगलातील झाडांवर मी आईवडिलांसमवेत स्वच्छंदपणे विहार करीत असे. कधी या झाडावर तर कधी त्या झाडावर. दिवस उजाडला की मी बाहेर पडत असे. आईवडिलांबरोबर राहिल्यावर मी समवयस्क मित्रांबरोबर रमू लागलो. त्यावेळी तासन् तास जगातल्या सर्व दु:खांपासून दूर आकाशात फिरायचो. मी माझे पंख पसरवून अशी काही भरारी आकाशात घ्यायचो जणू काही मीच इथला 'राजा' आहे. झाडांच्या डहाळ्यांवर खेळायचो, बागडायचो. मधुर गाणी गायचो. शेतातील धान्याच्या कणसातील दाणे टिपायचो. जंगलातील झाडांची फळे मनसोक्त खायचो. विशेषत: पेरूच्या झाडांची ! मग हिरव्यागार झाडांच्या सानिध्यात गाढ झोपयचो. रात्रीच्या वेळी झोप आली नाही तर आकाशातील चंद्र व चांदण्या यांचा लपंडाव पाहत राहायचो. असे होते ते मस्त जीवन ! पण माझ्या वाट्याला फारच थोडे दिवस ते सुख आले.

एके दिवशी मी जमिनीवरील दाणे टिपत असताना कसा कोण जाणे माझा पाय जाळ्यात अडकला. मी ओरडू लागलो; पण माझे सोबती माझ्या मदतीला न येता उडून गेले. मी फासेपारध्याच्या हाती सापडलो. त्याच्याजवळ इतरही पुष्कळ पक्षी होते. फासेपारध्याने मला एका श्रीमंत माणसाच्या हाती विकले. माझ्या सुंदरतेवर खुश होऊन त्या श्रीमंत माणसाने फासेपारध्याला भरपूर पैसे दिले.

तेव्हापासून मी हे गुलामगिरीचे जीवन जगतोय. माझ्या मालकाने मला सोनेरी पिंजऱ्यात बंदिस्त केले आहे. त्याने दिलेली फळे गोड मानून खातो. लहान मुले मला खेळणं समजून माझ्या सभोवती घेराव घालतात आणि काही ना काही खाऊ घालण्याचा प्रयत्न करतात. स्वातंत्र्य हिरावून घेतल्याचं दु:ख त्यांना काय समजणार !

तरीपण लोकांना आनंद देण्यासाठी खोटं हास्य चेहऱ्यावर आणतो. मनात नसतानाही इतरांना रमविण्यासाठी मला शीळ घालावी लागते. माझ्या बंदिस्त जीवनाची व्यथा फक्त तेच समजू शकतात, ज्यांनी असे बंदिस्त जीवन व्यतीत केले आहे. येथे माझ्यापासून माझं आयुष्य हिरावून घेतलं जात आहे. इतकेच नव्हे, तर माझी भाषाही हिरावून घेतली जात आहे. या घरातील व्यक्तींनी शिकवल्याप्रमाणे मी 'सुस्वागतम्', 'नमस्ते', 'राम राम', 'कृष्ण कृष्ण', 'मिठू मिठू' बोलतो. माझ्या मालकाला 'आत्माराम' अशी हाक मारतो. हे खरं आहे, की घरातल्या सर्वांना मी प्रिय आहे, पण तुम्ही अशा प्रेमाला काय म्हणणार ?

'घर कसले ही तर कारा
विष समान मोती चारा
प्रेमाचे बंधन द्वारा
मज अडवितो हा उंबरा'

मला येथे भरपूर खायला मिळते, तरीही मी इथे दु:खी आहे. या गुलामीच्या जीवनामुळे मी त्रस्त झालोय. भूतकाळातल्या रंगतदार आठवणी माझ्या दु:खात अजून भर घालतात. खूप वेळा स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न केला पण या घरातल्या व्यक्ती मला इतक्या लाड प्रेमाने वागवतात, की जगायला भाग पडावे लागते. सतत मी इतरांचे मनोरंजन करीत आहे. पण मग माझ्या भवितव्याचे काय ? मुक्तपणे फिरण्याचे भाग्य मला कधी लाभेल का ? मित्रा, पुन्हा केव्हा भेटू हे सांगता येणार नाही. मी माझ्या मालकाबरोबर परदेशी जात आहे. मला नेहमी एक प्रश्न पडतो की, स्वत:च्या स्वातंत्र्याबाबत जागृत असणारी ही माणसे उडण्याच्या आमच्या जन्मसिद्ध हक्कांवर पांघरूण घालून आम्हांला बंधनात का टाकतात ?

❖❖❖❖❖